


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ७८, गुरुवार १३ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# सोयाबीन खरेदीला २४ दिवसांची मुदतवाढ!

## खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला अखेर यश

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**नाफेड मार्फत महाराष्ट्रात खरेदी करण्यात येणाऱ्या सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ देण्याच्या मागणीसाठी गेल्या आठवड्यापासून आग्रही असलेल्या खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यास यश आले असून केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदीसाठी २४ दिवसांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानिमित्ताने सध्या नवी दिल्लीत असलेल्या खासदार नीलेश लंके यांनी गेल्या आठवडयात कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेऊन सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ देण्याची आग्रही मागणी केली होती. मागिल आठवडयात माध्यमांशी बोलताना सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय न झाल्यास संसदेसमोर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. सोमवारपर्यंत मुदतवाढीचा निर्णय न झाल्याने महाविकास आघाडीचे खासदार सुप्रिया सुळे, खा. नीलेश लंके, खा. ओमराजे निंबाळकर, खा. प्रशांत पडोळे, खा. प्रणिती शिंदे, खा. बळवंत वानखडे, खा. शिवाजी काळगे, खा. प्रतिभा धानोरकर, खा. वर्षा गायकवाड, खा. कल्याण काळे यांनी संसदेबाहेर आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.




### खासदारांची घोषणाबाजी !

शेतकऱ्याला भिकेला लावणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, शेतकरी विरोधी सरकारचा धिक्कार असो, सोयाबीनला मुदतवाढ न देणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, कोण म्हणते देत नाही, घेतल्याशिवाय राहत नाही, सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळालीच पाहिजे अशी घोषणाबाजी करत महाविकास आघाडीच्या खासदारांनी संसद परिसर दणाणून सोडला होता.

### खासदार लंके समाधानी

केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदीसाठी २४ दिवसांची मुदतवाढ दिल्यानंतर खासदार नीलेश लंके यांनी समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, नाफेड मार्फत सोयाबीन खरेदी सुरू करण्यात आल्यानंतर या योजनेला पूर्वी मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र अजूनही अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये सोयाबीन आहे. या सोयाबीनचीही खरेदी झाली पाहिजे अशी आमची रास्त मागणी होती. तसे झाले नसते तर शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले असते. शेतकरी हा अन्नदाता आहे. तो सुखी तर देश सुखी त्यामुळे आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर उभे आहोत असे ते म्हणाले.

### २४ दिवस मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता

केंद्र सरकारने सन २०२४-२५ च्या हंगामात महाराष्ट्रासह छत्तीसगड, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, राजस्थान आणि तेलंगणा या राज्यांमध्ये मुल्य समर्थन योजनेअंतर्गत सोयाबीन खरेदीस मान्यता दिली होती. ९ फेब्रुवारी अखेर १९.९९ एलएमटी सोयाबीन खरेदी करण्यात आले. त्याचा ८ लाख ४६ हजार २५१ शेतकऱ्यांना फायदा झाला. महाराष्ट्रातील खासदारांच्या मागणीची दखल घेऊन केंद्रीय कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी महाराष्ट्रात सोयाबीन खरेदीसाठी २४ दिवसांची मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली.

# कोतवाल भरतीसाठी आरक्षण सोडत

## २१ गावांमधील आरक्षण जाहीर



■ ऋत्वीक संदीप खेडेकर याच्या हस्ते चिठ्ठ्या काढून कोतवाल आरक्षण जाहिर करण्यात आले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी तालुक्यातील विविध २१ गावांच्या कोतवालांच्या जागांसाठीची आरक्षण सोडत काढण्यात आली. तहसिलदार गायत्री सैंदाणे, नायब तहसिलदार गणेश आढारी हे यावेळी उपस्थित होते.**

तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्या दालनामध्ये ऋत्वीक संदीप खेडेकर या लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठ्या काढून सोडत जाहीर करण्यात आली. कोतवाल भरतीची आरक्षण सोडत काढण्यात आल्याने आता २१ गावांमधील कोतवालांची पदे भरण्याची प्रक्रीया सुरू होणार आहे. ही पदे भरण्यात आल्यानंतर त्या-त्या गावांमधील महसुल यंत्रणेस मदत होणार असून तलाठी कार्यालयातील कामांना गती येईल.

**विविध गावांचे आरक्षण असे :**

इतर मागास प्रवर्ग : पाडळीदर्या, अळकुटी, पुणेवाडी
इतर मागास प्रवर्ग महिला : भाळवणी
अनुसूचित जाती प्रवर्ग : टाकळीढोकेश्वर
अनुसूचित जाती प्रवर्ग महिला : दैठणे गुंजाळ
सर्वसाधारण प्रवर्ग : किन्ही, जामगांव, गोरेगांव, शिरापुर, वासुंदे, वडगांवदर्या, रूई छत्रपती, वाळवणे, शिरापुर, कर्जुले हर्या,
सर्वसाधारण महिला : पळशी, राळेगणसिध्दी
आर्थिक दृष्टया दुर्बल घटक : ढवळपुरी
आर्थिक दृष्टया दुर्बल घटक महिला : राळेगणथेरपाळ
मराठा आरक्षण ई बी सी : चिंचोली
मराठा आरक्षण एस ई बी सी महिला :लोणीहवेली

# हयातीचे दाखले नसल्याने संजय गांधी योजनेतून १८ हजारांना वगळले

## ‘केवायसी’ची पूर्तता नसल्याने ६० हजारांवर टांगती तलवार

**अहिल्यानगरः प्रतिनिधी**



**संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांनी हयातीचे दाखले सादर न केल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील १८ हजार ८६३ जणांचा अनुदान लाभ बंद करण्यात आला आहे तसेच ‘केवायसी’ सादर न केलेल्या सुमारे ६० हजार लाभार्थ्यांचे अनुदान पुढील महिन्यापासून, मार्च २०२५ पासून बंद होणार आहे.**

राज्य सरकार मार्फत संजय गांधी, श्रावणबाळ अर्थसहाय्य योजनेचे सुमारे १ लाख ७३ हजार ८३० तर केंद्र सरकारच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, विधवा, अपंग आदींना मदतीचे सुमारे ४२ हजार असे एकूण २ लाख १५ हजार लाभार्थी आहेत. त्यांना दरमहा १५०० रुपयांची मदत दिली जाते.

यासंदर्भात माहिती देताना संजय गांधी निराधार योजनेचे तहसीलदार सचिन डोंगरे यांनी सांगितले की, राज्य सरकारच्या योजनेतील लाभार्थ्यांना दरवर्षी जूनपर्यंत हयातीचे दाखले सादर करणे बंधनकारक आहे. हयातीचा दाखला सादर केल्यानंतर जुलैपासून पुढील मदत दिली जाते. जिल्ह्यात या योजनेचे १ लाख ७३ हजार ८३० लाभार्थी होते. हयातीचे दाखले सादर न केल्याने १८ हजार ८६३ जणांचा लाभ आता बंद करण्यात आला आहे. त्यामुळे एकूण लाभार्थींची संख्या आता जिल्ह्यात १ लाख ३२ हजार ३०६ राहिली आहे.

केंद्र सरकारच्या निराधारांच्या मदतीच्या योजना राबवतानाही राज्य सरकारचा हिस्सा असतोच. त्यामुळे हयातीचे दाखले सादर न केलेल्या लाभार्थ्यांनाही केंद्र सरकारच्या योजनेतून मदत मिळणार नाही. या लाभार्थ्यांनी मार्चपूर्वी हयातीचे दाखले सादर केले तर बंद झालेल्या महिन्यापासून उर्वरीत पान ३ वर

# ‘लाडक्या बहिणी’चे पैसे कसे बंद करतात तेच पाहतो !

## जयंत पाटलांचा महायुती सरकारला इशारा आतापर्यंत ५ लाख लाभार्थ्यांची नावे वगळली

**मुंबई : प्रतिनिधी**



**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींची छाननी सुरू केली असून निकषात न बसणाऱ्या महिलांना अपात्र ठरवले जाणार आहे. आतापर्यंत पाच लाख लाभार्थींना अपात्र ठरवत त्यांचा लाभ बंद करण्यात आला आहे. यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे देखील आक्रमक झाले आहेत. त्यांनी सरकारला इशारा देत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद होणार, यासाठी आम्ही पक्ष संघटनेच्या माध्यमातून तालुका-तालुका पातळीवर लढाई उभारणार असल्याचेही सांगितले.**

महायुती सरकारने गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांची अर्थसाहाय्य केले जात आहे. त्याचा महायुतीला निवडणुकीत मोठा फायदा झाला. पण आता सरकारने या योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. त्यात अनेक महिलांनी खोटी माहिती देऊन या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर येत आहे. विशेषतः इतर सरकारी योजनांतील लाभार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सरकार या प्रकरणी काटेकोट पडताळणीवर भर देत आहे. आतापर्यंत या योजनेतून सुमारे ५ लाख लाभार्थींना वगळण्यात आले आहे.

उर्वरीत पान ३ वर

# अपने रंग में मुझको रंग दे !

## रिंकू राजगुरुच्या स्टेट्सने राज्यात धुराळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



**भाजपाचे कोल्हापूर जिल्ह्यातील राज्यसभा खासदार धनंजय महाडिक यांचा धाकटा मुलगा कृष्णराज महाडिक आणि सैराट चित्रपटातील अभिनेत्री रिंकू राजगुरू यांचा फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. यावर अनेकांनी कमेंट देखील केल्या आहेत. राज्यात या फोटोची चर्चा सुरू असताना रिंकू राजगुरुने इन्स्टाग्राम वर एक स्टोरी शेअर केली आहे. त्यामुळे चांगलाच धुराळा उडाला आहे. या फोटोत ती एकटी असली तरी त्या स्टोरीला तिने लावलेले गाणे अनेकांच्या भुवया उंचावणारे ठरले आहे.**

रिंकू राजगुरूने इंस्टाग्रामवर एक फोटो शेअर करत त्यावर अपने रंग में मुझको रंग दे हे गाणे लावले आहे. त्यामुळे आता तिने ठेवलेल्या या स्टेटसची चांगलीच चर्चा रंगली आहे. रिंकू राजगुरू हिच्या अंगात महाडिक यांच्यासोबत असलेल्या फोटो मधीलच ड्रेस दिसत आहे. यामध्ये ती पंजाबी ड्रेस मध्ये असून तिच्या कपाळावर कुंकू आणि चंद्रकोराची टिकली देखील आहे. या फोटोत रिंकू राजगुरुची नजर खाली झुकलेली आहे.अभिनेत्री रिंकू राजगुरू कोल्हापूर येथे आल्यानंतर तीने करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी अंबाबाईचे दर्शन घेतले. या दर्शनानंतर कृष्णराज महाडिक यांच्या सोबतचा तीचा एक फोटो सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. त्यामुळे रिंकू राजगुरू महाडिक घराण्याची सून होणार का? याची चर्चा रंगली आहे. त्यातच आता रिंकू राजगुरु हिने सोशल मीडियावर टाकलेल्या स्टेटस मुळे याबाबत अनेक तर्क लावले जात आहेत.










# चंदेरी

## ‘डॉन ३’मध्ये रणवीर सिंहला देणार टक्कर विक्रांत मॅसी!

बॉलीवूडमधील ‘डॉन’ सिनेमा आणि त्याचा रिमेक आणि पुढे याच सिनेमाचे आलेले भाग लोकप्रिय आहेत. १९७८ साली अमिताभ बच्चन यांचा आलेल्या डॉनचा फरहान अख्तरने २००७ मध्ये रिमेक केला. यात शाहरुख खानने मुख्य भूमिका केली होती. याच सिनेमाचा ‘डॉन २’ हा दुसरा भाग आला. यात शाहरुख खानची एन्ट्री, डायलॉग्स यामुळे प्रेक्षकांनी या सिनेमाला डोक्यावर घेतले होते. या सिनेमाच्या तिसऱ्या पार्टची घोषणा झाल्यावर मात्र यात शाहरुख दिसणार नसल्याने कोणता अभिनेता ही भूमिका करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. रणवीर सिंह या सिनेमात डॉनची भूमिका साकारणार अशी घोषणा चित्रपटांच्या निर्मात्यांनी केली. आता या सिनेमात खलनायकाची भूमिका कोण साकारणार या चर्चा सुरू आहे.

छोट्या पडद्यावरून करिअरची सुरुवात करणारा प्रसिद्ध अभिनेता ‘डॉन ३’ मध्ये खलनायकाची भूमिका साकारणार आहे. बॉलीवूडमध्ये सर्वोत्तम अभिनेत्यांच्या यादीत आता नाव सामील झाले आहे. या अभिनेत्याने 12th फेल आणि डेथ ऑफ द गंज यांसारख्या चित्रपटांमध्ये आपल्या अभिनय कौशल्याची चुणूक दाखवली आहे. या अभिनेत्याचे नाव आहे विक्रांत मॅसी. ओटीटीवर प्रदर्शित झालेल्या ‘सेक्टर ३६’ या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारल्यानंतर विक्रांत मॅसी आता मोठ्या पडद्यावरही खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. रिपोर्टनुसार, विक्रांत फरहान अख्तरच्या बहुचर्चित चित्रपट ‘डॉन ३’ मध्ये खलनायकाची भूमिका साकारणार आहे.



आतापर्यंत या चित्रपटाच्या निर्मात्यांनी रणवीर सिंग आणि कियारा अडवाणी यांच्या नावांचीच अधिकृत घोषणा केली आहे. याआधी रणवीर आणि विक्रांतने ‘लूटेरा’ आणि ‘दिल धडकने दो’ या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. मात्र, या दोन्ही चित्रपटांमध्ये विक्रांतने सहाय्यक अभिनेत्याच्या भूमिका साकारल्या होत्या. मात्र आता तो रणवीरसमोर मुख्य भूमिकेत झळकणार आहे. विक्रांत मॅसी शेवटचा ‘द साबरमती रिपोर्ट’ या चित्रपटात दिसला होता.



## शाजान पदमसीने बॉयफ्रेंडसोबत उरकला साखरपुडा!



**अजय देवगणबरोबर ‘दिल तो बच्चा है जी’ आणि रणबीर कपूरबरोबर ‘रॉकेट सिंग’मध्ये झळकलेली अभिनेत्री शाजान पदमसी तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. या अभिनेत्रीने तिच्या बॉयफ्रेंडबरोबर साखरपुडा केला आहे.**

साखरपुड्यातील काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करून ही आनंदाची बातमी दिली आहे. शाजान लग्न कधी करणार? याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. ३७ वर्षांची शाजान पदमसी व आशिष कनाकिया मागील काही वर्षांपासून डेट करत होते, आता त्यांनी साखरपुडा करून नात्यात पुढे जायचं ठरवलं आहे. शाजानचे होणारे पती आशिष हे कनाकिया ग्रुपचे डायरेक्टर आणि मूव्ही मॅक्स सिनेमाचे सीईओ आहेत. शाजानने या खास दिवसासाठी लेहेंगा निवडला, तर आशिष कनाकियाने शेरवानी घातली होती. शाजान पदमसी व आशिषची भेट एका कॉमन फ्रेंडद्वारे झाली होती. माझी आणि शाजानची ओळख माझ्या बालपणीच्या मित्राने करून दिली होती. मी पहिल्याच भेटीत आशिषकडे आकर्षित झाले होते. मात्र, मी घाई केली नाही. काही महिन्यांनंतर आम्ही दोघे डिनरवर भेटलो आणि नंतर आम्ही डेटिंग करू लागलो, असं शाजान म्हणाली होती. शाजानने तिच्यात व आशिषमध्ये काय साम्य आहे, ते सांगितलं होतं. आम्ही दोघे एकत्र खूप हसतो आणि मस्ती करतो. तो माझ्यावर खूप जोक्स करतो, आता मी हळूहळू ते जोक्स स्वीकारायला शिकले आहे. आशिष खूप काळजी घेणारा आहे. आम्ही दोघे पूर्णपणे वेगळ्या पार्श्वभूमीतून आलो आहोत, असं शाजान म्हणाली होती. शाजान पदमसीच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, तिने ‘हाउसफूल २’, ‘ऑरेंज’, ‘कनिमोळी’, ‘मसाला’, ‘पागलपन नेक्स्ट लेव्हल’, ‘डिस्को व्हॅली’ यासह अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. शाजान व आशिषने साखरपुडा केला आहे, मात्र ते दोघेही लग्न कधी करणार याबाबत त्यांनी सांगितलेलं नाही. दोघेही यावर्षी लग्न करतील, अशा चर्चा होत आहेत.

## सुझान खान आजही आमच्या कुटुंबातील सदस्य : राकेश रोशन

बॉलीवूड अभिनेता हृतिक रोशनने २००० मध्ये ‘कहो ना प्यार है’ या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पहिलं पाऊल ठेवलं. पहिल्याच चित्रपटाने त्याला मोठी प्रसिद्धी मिळवून दिली. या चित्रपटातील अभिनय आणि त्याच्या डान्स स्टेप्सने साऱ्यांनाच भुरळ घातली. यशानंतर त्याने लगेचच सुझान खानबरोबर लग्न केलं. त्यानंतर २०१४ मध्ये त्यांचा घटस्फोटही झाला. आता ऋतिक रोशनच्या घटस्फोटावर वडील राकेश रोशन यांनी मोकळेपणाने त्यांचं मत व्यक्त केलं आहे.

राकेश रोशन यांनी नुकतेच एका मुलाखतीत यावर उघडपणे भाष्य केलं. हृतिक रोशनबरोबर घटस्फोट झालेला असूनही सुझान खानचे रोशन कुटुंबाशी काय नातं आहे? या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी सांगितलं, त्या दोघांचं नातं तुटलेलं असलं तरी सुझान खान आजही आमच्या कुटुंबातील एक सदस्य आहे, असे ते म्हणाले. जे काही झालं ते एका जोडप्यामध्ये झालं. ते दोघेच एकमेकांच्या प्रेमात पडले, त्या दोघांनीच एकमेकांबद्दल मनात गैरसमज केले आणि वेगळे झाले. आमच्यासाठी सुझान या घरात आली तेव्हापासून आतापर्यंत ती या घरातील एक सदस्य आहे. मी अतिशय शिस्तबद्ध व्यक्ती आहे. त्यामुळे लहान असताना हृतिक आणि माझी मुलगी मला घाबरायचे. असं नाही की मी पटकन कुणाला ओरडतो. मात्र, मला शिस्तबद्ध राहणं आवडतं. माझं लग्न फार कमी वयात झालं होतं. अगदी वयाच्या २० ते २३ वर्षांत मला मुलं झाली होती. त्यामुळे आता आम्ही सगळे मित्रांसारखे राहतो. आम्ही मित्रांप्रमाणे एकमेकांशी वागतो, असं राकेश रोशन यांनी सांगितलं. हृतिक रोशन आणि सुझान खान या दोघांनी २०१४ मध्ये घटस्फोट घेतला आहे. मात्र, त्यांनी हा निर्णय का घेतला यावर दोघांनी अद्यापही भाष्य केलेलं नाही. इतकेच नाही तर हे दोघे आजही एकमेकांशी चांगल्या पद्धतीने संवाद साधतात. हृतिक सध्या सबा आझादला डेट करत आहे, तर सुझान खान अर्सलान गोनीला डेट करत आहे.



## १८० फ्लॉप सिनेमे देणारा बॉलीवूड अभिनेता मिथून ४०० कोटींचा मालक

**चित्रपट फ्लॉप होईल की हिट हे प्रेक्षक ठरवतात. दरवर्षी अनेक चित्रपट रिलीज होतात, त्यातले काही गाजतात; तर काही चित्रपट केव्हा रिलीज होतात आणि गाशा गुंडाळतात हे कळतही नाही. एका बॉलीवूड स्टारने त्याच्या करिअरमध्ये तब्बल १८० फ्लॉप चित्रपट दिले होते. करिअरमध्ये इतके फ्लॉप चित्रपट देणारा हा सुपरस्टार आजही सिनेसृष्टीत सक्रिय आहे.**

या स्टारची गणना ८० च्या दशकात अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना आणि राजेश खन्ना यांसारख्या सुपरस्टार्समध्ये व्हायची. प्रचंड संघर्ष केल्यानंतर सिनेसृष्टीत या अभिनेत्याला यश मिळालं, चित्रपटाच्या खूप ऑफर आल्या. अभिनेत्याने चित्रपटही केले, पण त्यातले अनेक फ्लॉप ठरले होते. करिअरमध्ये इतके फ्लॉप चित्रपट देणाऱ्या अभिनेत्याचे नाव मिथुन चक्रवर्ती होय. मिथुन यांनी त्यांच्या ४७ वर्षांच्या करिअरमध्ये १८० फ्लॉप चित्रपट दिले. त्यांनी स्वतःचे २०० चित्रपट पाहिलेच नसल्याचं म्हटलं जातं. मिथून चक्रवर्ती यांनी इतके फ्लॉप चित्रपट दिले असले तरी त्यांच्या हिट चित्रपटांची संख्याही मोठी आहे. मिथुनदा दरवर्षी एक डझनपेक्षा जास्त चित्रपटांमध्ये काम करायचे. एक वेळ अशी आली होती की मिथुन यांनी सलग ३३ फ्लॉप चित्रपटांमध्ये काम केले होते. १९८९ साली तर वर्षभरात त्यांनी तब्बल १९ चित्रपट केले होते. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत २७० हून अधिक चित्रपटांमध्ये अभिनय केला, त्यापैकी १८० चित्रपट फ्लॉप आहेत. या यादीत त्यांच्यानंतर जितेंद्र यांचा नंबर लागतो. जितेंद्र यांच्या नावावर १०१ फ्लॉप चित्रपट आहेत. मी ३७० हून अधिक चित्रपट केले आहेत, त्यापैकी जवळपास २०० चित्रपट मी आजपर्यंत पाहिलेले नाहीत. मी सर्व चित्रपटांमध्ये पूर्ण प्रामाणिकपणे आणि मेहनतीने काम केले, असं एका मुलाखतीत मिथुन चक्रवर्ती म्हणाले होते. मिथुन यांचा खूप मोठा चाहता वर्ग आहे आणि खूप लोक त्यांना सुपरस्टार मानतात. ते जवळपास ४०० कोटींच्या संपत्तीचे मालक आहेत. मिथुन चक्रवर्ती यांच्याकडे अनेक महागड्या कार आहेत ज्यात मर्सिडीज बेंझ १९७५, टोयोटा फॉर्च्युनर आणि फोर्ड एंडेव्हरसह अनेक आलिशान कारचा समावेश आहे.



## प्रियांका चोप्रा महेश बाबूच्या सिनेमातून करणार कमबॅक

**प्रियांका चोप्रा एस. एस. राजामौली यांच्या ‘SSMB29’ या बहुप्रतिक्षित चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात महेश बाबू मुख्य भूमिकेत आहे. प्रियांका चोप्रा, एस. एस. एस राजामौली आणि महेश बाबू हे दिग्गज एकत्र काम करणार असल्याने या चित्रपटाची सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे. बॉलीवूडची देसी गर्ल ‘स्काय इज पिंक’ या २०१९ साली आलेल्या हिंदी चित्रपटात शेवटची दिसली होती. गेली ५ वर्षे ती कुठल्याही हिंदी किंवा भारतीय सिनेमात दिसली नव्हती.**

प्रियांका चोप्रा ‘SSMB29’ या साउथच्या चित्रपटातून भारतीय सिनेमात पुनरागमन करत आहे. मधल्या काळात ती केवळ हॉलीवूड चित्रपटात दिसली. प्रियांकाने या सिनेमासाठी घेतलेल्या मानधनाची चर्चा रंगत आहे. तिने तब्बल ३० कोटी रुपयांची मागणी केली आहे. या मानधनामुळे ती एस.एस. राजामौली यांच्यासोबत आतापर्यंत काम केलेल्या सर्वात महागड्या अभिनेत्रींपैकी एक ठरली आहे. RRR साठी आलिया भट्टने घेतलेले ९ कोटी रुपये आणि ‘बाहुबली’साठी अनुष्का शेट्टीने घेतलेले ५ कोटी रुपये यांना मोठ्या फरकाने मागे टाकले आहे. असे असले तरी अद्याप चित्रपटाशी संबंधित कोणत्याही अधिकृत स्त्रोतांकडून या वृत्ताला दुजोरा देण्यात आलेला नाही. दरम्यान, ‘SSMB29’ च्या शूटिंगला हैदराबादच्या अल्युमिनियम फॅक्टरी येथे सुरुवात झाली असून, महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा दोघेही चित्रीकरणासाठी हजर आहेत. चित्रीकरणादरम्यान कोणतीही माहिती बाहेर जाऊ नये यासाठी एस.एस. राजामौली यांनी संपूर्ण टीमला एक गोपनीयता करार (NDA) साइन करण्यास सांगितले आहे, ज्यामुळे शूटिंग दरम्यान कलाकारांसह सेटवरील कुठल्याही व्यक्तीला मोबाईल फोन वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही. SSMB29 च्या टीमचे पुढील शूटिंग केनियाच्या जंगलांमध्ये होणार आहे, जिथे काही महत्त्वाची दृश्ये चित्रित केली जाणार आहेत. Pinkvilla च्या रिपोर्टनुसार, हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होईल, पहिला भाग २०२७ मध्ये आणि दुसरा भाग २०२९ मध्ये रिलीज केला जाणार आहे.



## प्रसिद्ध रॅपर रफ्तार दुसऱ्यांदा लग्नबंधनात

रॅप इंडस्ट्रीमधील प्रसिद्ध रॅपर रफ्तार दुसऱ्यांदा लग्नबंधनात अडकला आहे. अलीकडेच त्याच्या लग्नाची पत्रिका, हळदीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण रफ्तारने स्वतः दुसऱ्या लग्नाबाबत अधिकृतरित्या घोषणा केली नव्हती. पण आता रफ्तारच्या दुसऱ्या लग्नाचे फोटो, व्हिडीओ समोर आले आहेत.



३१ जानेवारीला रफ्तार फॅशन स्टायलिस्ट, अभिनेत्री मनराज जवंदाशी लग्नाच्या बेडीत अडकला आहे. जवळच्या मित्रांच्या आणि कुटुंबाच्या उपस्थितीत रफ्तार आणि मनराजचं मोठ्या थाटामाटात लग्न झालं आहे. दाक्षिणात्य रिती-रिवाजानुसार रफ्तार आणि मनराजने लग्न केलं आहे. रफ्तारचं हे दुसरं लग्न आहे. याआधी डिसेंबर २०१६मध्ये रफ्तारने कोमल वोहराशी पहिलं लग्न केलं होतं. या लग्नाच्या आधी दोघं पाच वर्षे एकमेकांना डेट करत होते. पण लग्नाच्या काही वर्षांनी २०२० मध्ये रफ्तारने कोमलबरोबर घटस्फोट घेण्याचे निश्चित केले. परंतु, कोरोनामुळे घटस्फोटाच्या प्रक्रियेत विलंब झाला. त्यामुळे रफ्तार आणि कोमलने २०२२ मध्ये घटस्फोट घेतला. रफ्तारची दुसरी पत्नी मनराज जवंदाचा जन्म कोलकातामध्ये झाला होता. ती फॅशन स्टायलिस्ट, फिटनेस फ्रीक आणि अभिनेत्री आहे. पदवीचं शिक्षण घेतल्यानंतर मनराजने मुंबईच्या FAD इंटरनॅशनमध्ये स्टायलिंगचा कोर्स केला होता. रफ्तारबरोबर तिने बऱ्याच म्युझिक व्हिडीओमध्ये काम केलं आहे. ती काही रिॲलिटी शोमध्येदेखील झळकली होती. याशिवाय तिने बऱ्याच जाहिरातीमध्ये काम केलं आहे.

### डोडी खान आहे कोण?

डोडी खान पाकिस्तानचा एक लोकप्रिय अभिनेता आणि मॉडेल आहे. त्यानं ‘दुर्ज’, ‘घबराना नहीं है’, ‘अखाडा’, ‘चौधरी’ यांसारख्या बऱ्याच लोकप्रिय चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तो संजय दत्तला आदर्श मानतो. त्याला बॉडी बिल्डिंगमध्ये खूप रस आहे आणि त्यामुळे तो बराच वेळ जिममध्ये घालवतो. डोडीने सोशल मीडियावर अनेक जिम ट्रेनिंगचे व्हिडीओ पोस्ट केले आहेत. राखी सावंतने लग्नाबद्दल म्हटले होते, की लग्न पाकिस्तानमध्ये इस्लामी रिती-रिवाजानुसार होणार आहे. भारतात रिसेप्शन करणार असून हनीमूनसाठी स्वित्झर्लंड किंवा नेदरलँडला जाणार आहे, तर दुबईत स्थायिक होणार आहेत. याआधी राखी सावंतने दोनदा लग्न केलं होतं. आता हे राखीचं तिसरं लग्न होतं. मात्र ते होण्याआधीच मोडलं.



## राखी सावंतशी तिसरं लग्न करण्यास ‘त्याचा’ नकार

**कॉन्ट्रोव्हर्सी व ड्रामा क्वीन राखी सावंत पुन्हा एकदा चर्चेत आहे. यावेळीही चर्चेचं कारण तिचं लग्न आहे. राखी सध्या तिच्या तिसऱ्या लग्नाच्या बातम्यांमुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी राखीने दावा केला होता की ती पाकिस्तानची सून होणार आहे. ती पाकिस्तानी अभिनेता डोडी खानशी लग्न करत आहे, मात्र आता डोडीने नकार दिला आहे. त्याने राखी सावंतची माफीही मागितली आहे.**

राखी सावंतने म्हटलं होतं की ती पाकिस्तानी अभिनेता आणि पोलीस अधिकारी डोडी खानच्या प्रेमात आहे आणि दोघेही लवकरच लग्न करणार आहेत. आम्ही दोघे एकमेकांवर प्रेम करतो. तो पाकिस्तानचा आहे आणि मी भारताची आहे, त्यामुळे आम्ही प्रेमविवाह करणार आहोत, असं राखी म्हणाली होती. पाकिस्तानची सून झाल्यावरही नेहमीच भारताची मुलगी राहीन, असं राखीने म्हटलं होतं. राखीच्या लग्नाची बातमी दिल्यानंतर आता डोडी खान म्हणाला की, त्याने राखीला प्रपोज केलं होतं, पण आता तो लग्न करणार नाही. राखीने तिच्या आयुष्यात खूप दुःख पाहिलंय, तिच्या धाडसीपणामुळेच ती आवडते, असं डोडीने म्हटलं. डोडी म्हणाला, की नमस्कार भारत आणि पाकिस्तान, मी डोडी खान आहे. काही दिवसांपूर्वी तुम्ही सोशल मीडियावर माझा एक व्हिडीओ पाहिला असेल, ज्यात मी राखी सावंतला प्रपोज केले होते. मी तिला चांगलं ओळखतो. त्यामुळे मी तिला प्रपोज केलं होतं. मला समजलं की तिचा देवावर खूप विश्वास आहे. तिने तिच्या आयुष्यात खूप चढ-उतार पाहिले आहेत, तिने तिचे आई-वडील गमावले आहेत, ते आजारी असताना ती त्यांच्याबरोबर होती. तिच्या आयुष्यात एक मुलगा आला, त्याने तिच्याबरोबर काय केलं, ते तुम्हा सर्वांना माहीत आहे. ती त्या धक्क्यातून बाहेर आली आहे. तिने इस्लाम धर्म स्वीकारला, उमराहसाठी गेली आणि तिचे नाव बदलून फातिमा ठेवले. मला ते खूप आवडलं म्हणून मी तिला प्रपोज केलं. लग्नाला नकार देण्याचं कारण सांगत डोडी म्हणाला, पण, मला वाटतं की लोकांना हे नातं मान्य नाही. कारण मला खूप मेसेज आणि व्हिडीओ आले आहेत आणि मी ते सहन करू शकत नाही. राखी तू माझी खूप चांगली मैत्रीण आहेस आणि कायम राहशील. पण मी तुझ्याशी लग्न करू शकत नाही. मी तुला वचन देतो की तू पाकिस्तानची सून होशील. मी तुझे लग्न माझ्या एका भावाशी लावेन.



## शॉर्ट न्यूज

### विजेच्या धक्क्याने मुलीचा मृत्यू

**नगर :** शहरातील वाकोडी रोडवरील औसरकर मळा येथे विजेचा धक्का बसून एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. सृष्टी गणेश दुर्गिष्ट (रा. औसरकर मळा, वाकोडी रोड) असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. दुर्गिष्ट यांच्या घरासमोर विजेचा खांब वाकलेला आहे. मयत मुलगी दुसऱ्या मजल्यावर गेली असता, तिचा हात विद्युत वाहिन्यांना लागला. तिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी महावितरणच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आ. संग्राम जगताप यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### मोबाईल लंपास करणारे जेरबंद

**श्रीगोंदा :** स्थानिक पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने शिक्रापूर येथे चाकूचा धाक दाखवून मोबाईल चोरणाऱ्या चोरट्यांना अटक केली आहे. या आरोपींनी खराडी येथून मोटारसायकल चोरी करून शिक्रापूर येथे मोबाईल चोरीचा गुन्हा केल्याचे उघड झाले आहे. गणेश कैलास भोसले (वय १८, रा. मावळेवाडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) व अजय माणिक घेगडे (रा. राजापूर, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांच्यासह त्यांच्या एका साथीदाराने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे

### अहिल्यादेवी यांचे कार्य प्रेरणादायी

**श्रीरामपूर :** तालुक्यातील कमालपूर येथील असंख्य कार्यकर्त्यांनी तालुकाध्यक्ष दीपक पटारे यांच्या माध्यमातून काल लोणी येथे पालकमंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत भाजप पक्षात प्रवेश केला. या सर्व कार्यकर्त्यांचे ना. विखे पाटील यांनी पक्षात स्वागत केले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा कार्याध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष दीपक पटारे, प्रकाश चित्ते, डॉ. शंकर मुठे, नानासाहेब पवार, अभिषेक खंडागळे, शरद नवले आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### शिक्षकाला जीवे मारण्याची धमकी

**पाथर्डी :** येथे महसूल, पोलीस व पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने संयुक्तरित्या राबवलेल्या मोहिमेमुळे अनेक वर्षांच्या कालखंडानंतर बारावीचा पहिलाच इंग्लिश विषयाचा पेपर कॉपीमुक्त वातावरणात पार पडला. बाहेरून कॉपी देता न आल्याने तिसगाव येथे एका ए. के. असे टोपण नाव घेतलेल्या तरुणाने केंद्रसंचालक हेमंत नागरे व सुनील शेटे यांना जीवे मारण्याची धमकी दिली. यासंदर्भात पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला असून सचिन ढाकणे या शिक्षकाला सुद्धा एका तरुणाने वर्गाच्या बाहेरून चाकूचा धाक दाखवला.

### प्रतापपुरात बिबट्याचा हल्ला

**संगमनेर :** तालुक्यातील प्रतापपूर नगर येथे बिबट्याने दोघांवर हल्ला केला. या हल्ल्यातून ते दोघे बालबाल बचावले. संकल्प अर्जुन आंधळे हा मुलगा दूध पोहोचविण्यासाठी चालला होता. यावेळी सर्जेराव नाना आंधळे यांच्या वस्तीजवळ भक्ष्याच्या शोधात दबा धरून बसलेला बिबट्या संकल्पवर चालून आला. मात्र, संकल्पने यावेळी प्रसंगावधान राखत जोरात आरडाओरडा केल्यामुळे बिबट्याने तेथून पळ काढली. तत्पूर्वी त्याच परिसरात सुनील बबन इलगे यांच्यावरही बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

# राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा विजेत्या महाराष्ट्र संघात अकोल्याची कन्या फिजा सय्यद

## उत्तर प्रदेशातील मेरठ येथे स्पर्धा संपन्न

**अकोले : प्रतिनिधी**

**१६ व्या वरिष्ठ पश्चिम विभागीय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा मध्ये महाराष्ट्र संघास अजिंक्यपद मिळाले आहे. या संघात अकोले ची कन्या फिजा फत्तू सय्यद हिने उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. उत्तर प्रदेशातील मेरठ येथे ६ ते ९ फेब्रुवारी रोजी झालेल्या १६ व्या वरिष्ठ पश्चिम विभागीय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा संपन्न झाल्या.**



अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याची कन्या फिजा सय्यद हिने अतिशय चमकदार कामगिरी केली आहे. फिजा सय्यद हि आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू आहे. तालुक्यापासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत विविध स्पर्धांमध्ये यशस्वीरित्या सहभागी झाल्या आहेत. २०१७ च्या २४ व्या सिनियर महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप मध्ये मुंबई उपविजेता संघात सहभागी . २०१८ मध्ये औरंगाबाद (एम एच) येथे झालेल्या २४ व्या ज्युनियर राष्ट्रीय महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकले. ३६ वी ज्युनियर राष्ट्रीय सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप २०१८-२०१९ आंध्र प्रदेश येथे आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्यात महाराष्ट्र संघात मोठी भूमिका बजावली. २०१८ मध्ये १९ वर्षांखालील भारतीय संघाने सातवी आशियाई ज्युनियर महिला सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप जिंकली त्या संघात सहभाग, फिलीपिन्समध्ये झालेल्या स्पर्धेत भारतीय संघासाठी चांगली कामगिरी केली. २०२२ मध्ये थायलंडमधील पटाया येथे झालेल्या आशियाई महिला विद्यापीठ सॉफ्टबॉल चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाची उत्कृष्ट कामगिरीत सहभागी, २०२२-२३ मध्ये वरिष्ठ राज्य सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. १४ व्या फेडरेशन कप राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत २०२३-२४ मध्ये सुवर्णपदक जिंकले. ४४ व्या वरिष्ठ राष्ट्रीय सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धेत २०२२-२३ मध्ये सुवर्णपदक जिंकले.

अकोले सारख्या दुर्गम, आदिवासी भागातील फिजा सय्यद हिचे यश उल्लेखनीय आहे. भाजपा अल्पसंख्याक आघाडी चे प्रदेश उपाध्यक्ष फत्तूभाई सय्यद यांची कन्या आहे. तिच्या या यशाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रीय शीख शिकलीगर संघटनेची राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी लाभसिंघ घटाडे तर उपाध्यक्ष बलजीतसिंघ बावरी

**नांदेड : प्रतिनिधी**

**शीख शिकलीगर समाजाची एकमेव संघटना असलेल्या राष्ट्रीय सिक सिकलीगर संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारणीची निवड जाहीर करण्यात आली असून राष्ट्रीय अध्यक्षपदी पंजाब येथील लाभसिंग घटाडे राष्ट्रीय उपाध्यक्षपदी बलजीतसिंघ बावरी तर सचिवपदी ठाकूरसिंघ बावरी यांच्यासह कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.**





देशभरातील सिख सिखलीकर समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व रोजगाराच्या समस्यांची सोडवण्यासाठी व समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देशभरामध्ये राष्ट्रीय सिख सिखलीगर संघटना ही एकमेव संघटना कार्यरत आहे. या संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक सचखंड हुजूर साहिब येथील अरुणा वैकुंठधाम माहेश्वरी कौठा येथे बलजीतसिंघ बावरी यांनी दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी आयोजित केली होती. यापूर्वी राष्ट्रीय कार्यकारिणीची २०१७ मध्ये भोपाळ २०२४ ऋषिकेश येथे बैठक झाली होती या बैठकीला देशभरातील विविध राज्यातून शिकलीकर समाजाचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी एकमताने राष्ट्रीय कार्यकारणी निवड करण्यात आली राष्ट्रीय अध्यक्षपदी पंजाब येथील लाभसिंघ घटाडे, राष्ट्रीय उपाध्यक्षपदी बलजीतसिंघ बावरी महाराष्ट्र, राष्ट्रीय कोषाध्यक्ष भिकमसिंघ बावरी हरियाणा, सचिव ठाकुरसिंघ बावरी, हरदेवसिंघ बावरी तेलंगाना, सहसचिव परनसिंघ थिल्यापतिया राजस्थान, राष्ट्रीय संघटक बाबा प्रमाणसिंघ हरियाणा, राष्ट्रीय प्रवक्ता दारासिंघ घटाडा महाराष्ट्र यांच्यासह स बुधासिंग भोंड उत्तर प्रदेश, अमरदीपसिंग टाक कर्नाटक, मानसिंग डांगी गुजरात, रूपसिंघ पटवा मध्यप्रदेश, महेंद्रसिंघ बावरी गुजरात,दिपसिंघ टाक कर्नाटक, त्रिलोकसिंग बावरी मध्यप्रदेश, भिमसिंघ जुनी राजस्थान, अशोकसिंघ हरियाणा, पातकौर भादा महाराष्ट्र, जितसिंघ टाक पंजाब, पप्पूसिंघ जुनी दिल्ली, गुंडासिंग थिलपितिया तेलंगाना, तर सदस्य जगतसिंघ टाक, बिरसिंघ मध्यप्रदेश, मलकितसिंघ उत्तरप्रदेश, राजूसिंघ हरियाणा, धरमसिंघ खिची यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय कार्यकारिणीच्या निवडीमुळे शीख शिकलीगर समाजामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नेवासे फाट्यावर अतिक्रमणधारकांची धावाधाव

## बांधकाम विभाग ॲक्शन मोडवर



**नेवासा : प्रतिनिधी**

**नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गालगतची अतिक्रमणे तात्काळ काढण्याची भूमिका जिल्हाधिकाऱ्यांनी घेतल्यानंतर नेवासे फाट्यावरील आपल्या जागेवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ॲक्शन मोडवर आला आहे. त्यामुळे पक्की अतिक्रमणे वाचवण्यासाठी अतिक्रमणधारकांची धावपळ सुरू असून, नेवासे फाट्यावर काही अतिक्रमणधारकांनी मंगळवारी स्वतःहून अतिक्रमित टपऱ्या, ओटे, पडव्या, शेड हटवण्यास सुरुवात केली.**

येत्या दोन-तीन दिवसांत नेवासे फाट्यावर सरकारी यंत्रणा अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यासाठी सरसावल्याचे दिसत आहे. नेवासे फाट्यावरील सरकारी जागेवरील अतिक्रमणे हा फक्त तालुक्यातील विषय नाही, तर मराठावाडा, विदर्भाचे पश्चिम महाराष्ट्रातील प्रवेशद्वार नेवासे तालुक्यात असून, नेवासे फाट्यावर अहोरात्र हजारो वाहने ये-जा करीत असतात. छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर महामार्गाचे मध्यवर्ती ठिकाण नेवासे फाटा असून, या दोन्ही जिल्ह्यादरम्यान नेवासे फाट्यावरच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न अनेक जण सतत अनुभवत असतात.

नेवासे फाट्यावर नगरच्या दिशेने एक किमी, छत्रपती संभाजीनगरच्या दिशेला एक ते दीड किमी, शेवगावच्या मार्गालगत अर्धा किमी, तर फाटा ते ज्ञानेश्वर कॉलेज मार्गावर दोन किमी मार्गाच्या दुतर्फा सरकारी जागेवरील अतिक्रमणे हा प्रमुख प्रश्न बनला आहे. गेल्या महिन्यात नेवासे फाट्यावर बाप-लेकाचा मृत्यू अपघातात झाला. गेल्या तीन दिवसांपासून काही अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याचा निर्णय घेतला असून, प्रत्यक्ष कृतीही सुरू आहे. मात्र, पक्क्या इमारती बांधून अतिक्रमण केलेल्यांना जमीनदोस्त करण्यासाठी सरकारी यंत्रणेचीच मोहीम सुरू करावी लागणार असल्याचे दिसते. नेवासे फाट्यावर काही अतिक्रमण धारकांची स्वतः अतिक्रमण काढून घेण्याची धावपळ दिवसभर सुरु होती.

# अखेर मंत्र्यांना पीए, पीएस, ओएसडी मिळाले

## मंत्रिमंडळ विस्तारानंतर २ महिन्यांनी नियुक्त्या | मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनमानीला लावला चाप

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर जवळपास २ महिन्यांनी बहुतांश मंत्र्यांना खासगी सचिव, स्वीय सहाय्यक आणि विशेष कार्य अधिकारी मिळालेत. यासंबंधीचे शासनादेश काल उशिरा काढण्यात आले. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक प्रकरणांत मंत्र्यांनी शिफारस केलेली नावे वगळून त्यांचा प्रस्ताव परत पाठवला आहे. त्यामुळे आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा मंत्र्यांचा प्रयत्न उधळला गेला आहे. या मंत्र्यांना आता नव्याने प्रस्ताव पाठवावा लागणार आहे.**

यासंबंधीच्या माहितीनुसार, ११ कॅबिनेट व राज्यमंत्र्यांकडील स्टाफला काल मंजुरी देण्यात आली. या नियुक्त्या रखडल्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर लगेचच या नियुक्त्या करण्यात आल्यात. यापूर्वी ५ वेगवेगळे आदेश काढून पीए, पीएस, ओएसडी नेमण्यात आलेत. पण मुख्यमंत्र्यांनी यावेळी अनेक मंत्र्यांचे प्रस्तुत अधिकारी नेमण्याचे प्रस्ताव परत पाठवल्याची माहिती आहे.

ट्रॅक रेकॉर्ड तपासूनच झाल्या नियुक्त्या

महाविकास आघाडीच्या मंत्र्यांकडे असलेल्या अधिकाऱ्यांना घ्यायचे नाही, ज्यांचे ट्रॅक रेकॉर्ड चांगले नाही त्यांनाही घ्यायचे नाही अशा काही चाळण्या या नियुक्त्यांसंबंधी लावण्यात आल्या होत्या. त्यानुसार मंत्र्यांनी शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांची पडताळणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओएसडी चंद्रशेखर वझे यांनी स्वतः अनेकांच्या मुलाखती घेतल्या. सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री कार्यालयाने मंत्र्यांकडून शिफारस झालेल्या अधिकाऱ्यांची चौकशी केली. त्यांचे ट्रॅक रेकॉर्ड तपासले. विशेषतः यापूर्वी एखाद्या घोटाळ्यात त्यांचे नाव आले आहे का? याची तपासणीही केली.

स्टाफ नसल्याने काम करता येत नसल्याची सुरू होती ओरड

उल्लेखनीय बाब म्हणजे सत्ताधारी महायुतीमधील भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही घटकपक्षांतील काही मंत्र्यांनी आपल्याला पीए, पीएस मिळत नसल्यामुळे कामच करता येत नाही अशी ओरड केली होती. त्यानुसार त्यांनी आपल्या मर्जीतील काही अधिकाऱ्यांची नावे रेटली होती. पण त्यातील अनेक नावांना मुख्यमंत्र्यांनी कात्री लावली आहे. त्यामुळे अजूनही चार ते पाच मंत्र्यांना पूर्ण स्टाफ मिळाला नाही. या मंत्र्यांना नव्याने शिफारस प्रस्ताव पाठवावा लागणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

दुसरीकडे, भाजपच्या एका ज्येष्ठ मंत्र्याने आपल्या मर्जीतील पीएस हवा यासाठी हट्ट धरला. हा मंत्री फडणवीस यांच्या जवळचा होता. पण त्याचाही हट्ट पुरवला गेला नाही. अन्य एक ज्येष्ठ मंत्रीही



आपल्या पसंतीच्या नावासाठी अडून बसले होते. त्यामुळे त्यांनी सूचवलेल्या नावाची योग्य ती खातरजमा करून मगच त्याला मंजुरी देण्यात आली. भाजपच्या एका कॅबिनेट मंत्र्यांच्या बाबतीतही असाच प्रकार घडला.

(पान १ वरून)

### हयातीचे दाखले नसल्याने संजय गांधी योजनेतून १८ हजारांना वगळले

मार्चपर्यंतचा हप्ता मिळू शकेल. मात्र मार्चनंतर हयातीचा दाखला सादर केल्यास मार्चपर्यंतची मदत मिळणार नाही. त्यामुळे संबंधितांनी तहसीलदारांकडे संपर्क साधून हयातीचे दाखले सादर करावेत.

जिल्ह्यात १ लाख ३२ हजार ३०६ लाभार्थी असले तरी त्यांना डिसेंबरमध्येच 'केवायसी' पूर्ततेच्या सूचना देण्यात आल्या होत्या. अन्यथा फेब्रुवारीपासून लाभ मिळणार नसल्याची सूचना देण्यात आली होती. मात्र अद्यापि ६० हजार लाभार्थ्यांनी 'केवायसी'ची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे त्यांनाही मार्चनंतर लाभ मिळणार नाही. त्यामुळे संबंधितांनी तहसीलदारांशी संपर्क साधून 'केवायसी'ची पूर्तता करावी असेही आवाहन सचिन डोंगरे यांनी केले आहे. केंद्र सरकारकडून निराधारांसाठी दिली जाणारी मदत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात सन २०२१ पासूनच जमा केली जात होती. त्यामुळे राज्य सरकारकडूनही आता आधार प्रमाणित खात्यावर हप्ता जमा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

### 'लाडक्या बहिणीं'चे पैसे कसे बंद करतात तेच पाहतो !

**नेमके काय म्हणाले जयंत पाटील?**

आता आम्ही लाडक्या बहिणीची बाजू घेऊन काम करणार आहोत, असे जयंत पाटील म्हणाले. लाडक्या बहिणीचे पैसे बंद होणार नाहीत, यासाठी आमचा लढा राहणार असल्याचेही ते म्हणाले. लाडक्या बहिणींनो आम्ही तुमच्या मागे आहोत, असा विश्वासही त्यांनी दिला.लाडक्या बहिणींनी तुम्हाला मते दिली आहेत, त्यांना तुम्ही शब्द दिला आहे, त्यामुळे एकदा दिले तर दिले, त्यांनी मते दिली आहेत, त्यामुळे बघून द्यायचे होते, आम्ही घाई करा म्हणत होतो का? असा खोचक टोला जयंत पाटील यांनी महायुती सरकारला लगावला आहे. लाडकी बहिणींसाठी पैसे बंद होणार नाही, यासाठी आम्ही पक्ष संघटनेच्या माध्यमातून तालुका-तालुका पातळीवर लढाई उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**एकूण ५ लाख लाभार्थ्यांची नावे वगळली**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून सुमारे ५ लाख लाभार्थ्यांना वगळण्यात आले आहे. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असणाऱ्या २ लाख ३० हजार महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. तसेच वय वर्षे ६५ हून अधिक असणाऱ्या १ लाख १० हजार महिलांची नावेही या योजनेतून हटवण्यात आली आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमो शक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या, स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १ लाख ६० हजार महिलांची नावेही लाडकी बहीण योजनेतून कमी करण्यात आली आहे. त्यामुळे एकूण ५ लाख महिला लाभार्थ्यांची नावे या योजनेतून वगळण्यात आली आहेत.


**फेब्रुवारीचा हप्ता केव्हा मिळणार?**

दुसरीकडे, या योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता केव्हा मिळेल याविषयी महिला वर्गात चर्चा सुरू झाली आहे. जानेवारीचा हप्ता महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यानंतर मिळाला होता. त्यामुळे या महिन्यातही त्याच कालावधीत लाभ मिळण्याची शक्यता आहे. विशेषतः महायुती सरकारने निवडणुकीच्या प्रचारात या योजनेतील अर्थसहाय्याची रक्कम १५०० वरून २१०० करण्याची ग्वाही दिली होती. आता राज्याच्या अर्थसंकल्पात तशी एखादी तरतूद केली जाते काय? असा सवालही या प्रकरणी चर्चिला जात आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# शब्द! शब्द!!

लफ़्ज़ या तो दिल में उतर जाते हैं या दिल से उतर जाते हैं, असे वाक्य वाचनात आले. किती सुंदर आणि किती अर्थपूर्ण!
लफ़्ज़ हा मूळचा अरबी शब्द. अरबीतून तो उर्दूमध्ये आला. लफ़्ज़ म्हणजे शब्द. अल्फ़ाज़ हे त्याचे अनेकवचन होय. हिंदी भाषेतही तो मधून मधून डोकावतो. काही ठिकाणी लफ़्ज़चे अनेकवचन लफ़्ज़ असेही आढळते.
ॲरिस्टॉटलच्या मतानुसार शब्द साहित्याचा मूल घटक. आपले संस्कृत साहित्यशास्त्र सांगते, जगात शब्द नावाची ज्योत नसती तर जग निबीड अंधारात राहिले असते. हा शब्दाचा थोर महिमा आहे. संत तुकारामांनी शब्दाला देव मानले आहे. संत ज्ञानेश्वर शब्दांच्या व्याप्तीबद्दल म्हणतात,




सूर्यबिंब जरी बचकेचि एवढे
परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडे
शब्दाची व्याप्ती येणे पाडे
अनुभवावी
सूर्यबिंब दिसताना बचकभर आकाराचे दिसले तरी आपला प्रकाश फैलावण्यासाठी त्याला (स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ असे) त्रैलोक्यसुध्दा अपुरे पडते. शब्दाची व्याप्तीही तशीच अनुभवास येते.
उर्दू भाषेतही लफ़्ज़ या शब्दाबद्दल सुंदर वर्णन सापडते.
ज़ख़्म तलवार के गहरे भी हों, मिट जाते हैं।
लफ़्ज़ तो दिल में उतर जाते हैं
भालों की तरह।।
घाव तलवारीचे असले तरी भरून येऊ शकतात; पण शब्द मात्र भाल्यासारखे हृदयात रुतून बसतात.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# शिवपानंद रस्त्यांसाठी निधी कमी पडणार नाही

## उपमुख्यमंत्री अजित पवारांची ग्वाही । शरद पवळे, दादासाहेब जंगले यांनी घेतली भेट

मुंबई : प्रतिनिधी

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतपानंद शेतरस्त्यांसंदर्भात ठोस निर्णय घेउन शेतरस्ते बंद करणारांवर महसूल विभागामार्फत गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर आता राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शेतपानंद शेतरस्त्यांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही दिली.**



शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे शरद रसाळ व दादासाहेब जंगले यांनी अजित पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यावेळी पवार यांनी निधीची कमतरता पडणार नाही अशी ग्वाही दिली.

शेतकरी समृध्द झाला तर महाराष्ट्र समृध्द होईल या उददेशने महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून शेत तिथे रस्त्यांसाठी राज्यभर शासन निर्णयासह उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी राज्यभर जनजागृती तसेच जन आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्यात आल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व शिव पाणंद आणि शेत रस्त्यांची हद्द निश्चित करून रस्त्यांची कामे पुर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

ग्रामस्तरीय शेत रस्ता समिती स्थापन करून त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा, शिवपानंद शेत रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एक महिन्यात निकाली काढावीत, शिवपाणंद रस्ते, शेत रस्ते, सार्वजनिक वहीवाटीच्या रस्त्यांच्या मोजणी आणि पोलीस संरक्षणासाठी असलेली आकरण्यात येऊन नये या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतही चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक निर्णय घेतला आहे. रस्त्यांचे नंबरी सर्वे क्षण करून त्या हटविणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

### चळवळीचे यश

**राज्यातील ब्रिटीशकालीन शिव पानंद शेत रस्ते खुले करण्याचा सरकारचा निर्णय ऐतिहासिक आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीचा मार्ग खुला होणार हेच शिवपानंद चळवळीचे मोठे यश असल्याचे पवळे व जंगले यांनी सांगितले.**

### दर्जेदार रस्त्यांसाठी पुढाकार घ्या

**शेतरस्त्यांप्रकरणी तहसिलदारांच्या निर्णयावर उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अपील केल्यानंतर त्यांनीच अंतिम निकाल देण्याबाबब शासन सकारात्मक असून शेतरस्त्यांचा उल्लेख झाल्याशिवाय वाटप पत्र मंजुर करण्यात येऊ नये या चळवळीच्या विविध मागण्यांचा विचार सरकारकडून करण्यात आल्याने जिल्हा, तालुका तसेच ग्रामप्रशासनाची जबाबदारी वाढली आहे. शेतकऱ्यांबरोबरच नागरीकांनी शेतरस्ते करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा.**

शरद पवळे, दादासाहेब जंगले

# पानोलीत ४१घरकुलांना मंजुरी

## मा. सरपंच संदीप गाडेकर यांची माहिती

पानोली : प्रतिनिधी

**खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पानोली येथे ४१ घरकुलांना मंजुरी मिळाल्याची माहिती पानोलीचे मा. सरपंच संदीप गाडेकर यांनी दिली.**



प्रधानमंत्री घरकुल आवास योजना ही गरीबांसाठी असणारी कल्याणकारी योजना केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येत असून सन २०१६-१७ पासून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गरजू लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी ड तयार करण्यात आली होती. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातून विधानसभेत गेल्यानंतर आमदार नीलेश लंके यांनी व त्यांच्या संपर्क कार्यालयाकडून प्रत्येक ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा करून सर्व गरजूंना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी प्रतिक्षा यादी तयार करण्याबाबत सांगण्यात येत होते. त्यामुळे तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने गरजू लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी तयार करून ती पंचायत समितीकडे पाठविली होती. या यादीची पडताळणी होउन पानोली येथे ४१ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाल्याचे मा. सरपंच गायकवाड यांनी सांगितले.



पारनेर तालुक्यात चार हजारांवर लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ झाला असून ही योजना सक्षमपणे राबविण्यासाठी खा. नीलेश लंके व त्यांच्या यंत्रणेने घेतलेले परीश्रम त्यासाठी कामी आल्याचे गाडेकर यांनी नमुद केले.

### हे आहेत लाभार्थी

**अर्चना गायकवाड, बाळूबाई रासकर, सुलोचना क्षिरसागर, गणपत व्यवहारे, मुकूंद वारे, संतोष गाडेकर, राजेंद्र झंजाड, लिलाबाई वाखारे, भिमाबाई साठे, जया झगडे, भाउसाहेब क्षिरसागर, मैनाबाई औटी, गोदाबाई वारे, आशा इंगळे, संगिता खोरे, सारिका जिरेकर, सिताबाई देशमुख, शशिकांत जोजार, शिल्पा जाधव, शरद भगत, पल्लवी कुलकर्णी, सिमा शिंदे, शबरी चौधरी, गणेश शिंदे, सुनील गायकवाड, बबन गायकवाड, देविदास इंगळे, गणेश रासकर, प्रभाकर घोलप, चंद्रकला गायकवाड, बाळू पवार, संगिता गाडेकर, गंगाधर गायकवाड, सत्यभामा वारे, यमुनाबाई शिंदे, विना झगडे, केरू इंगळे,चंद्रकला शिंदे, भामाबाई पवार, बाळू गायकवाड.**

# दिव्यांगांचे जीवन समृध्द करण्याचा ध्यास

## खासदार नीलेश लंके यांचा संकल्प



पारनेर : प्रतिनिधी

**दिव्यांग बांधवांना व्यवसायाच्या माध्यमातून त्यांच्या पायावर उभे करून आत्मसन्मानाने समृध्द करण्याचा आपण ध्यास घेतला असून येत्या वर्षभरात ५०० दिव्यांग बांधवांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा संकल्प खा. नीलेश लंके यांनी केला.**

दिव्यांगांना आत्मनिर्भर करण्यासाठी खा. लंके यांच्या संकल्पनेतून दिव्यांगांच्या रोजगार निर्मितीसाठी ई-रिक्षाच्या माध्यमातून व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा खा. लंके यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

अपंगांना स्वावलंबी करण्यासाठी नीलेश लंके अपंग कल्याणकारी प्रतिष्ठान काम करत आहे. याच प्रतिष्ठानच्या माध्यमातून दिव्यांगांना देण्यात येणारे वाहन असे तयार करण्यात आले आहे की,ते वाहन कोणताही दिव्यांग स्वतः चालवत नेउन स्वतःचा व्यवसाय करू शकतो. रसवंती गृह, झेरॉक्स सेंटर, टी सेंटर, चाट सेंटर, स्टेशनची सेंटर आदी व्यवसाय या वाहनाच्या माध्यमातून सहजपणे करता येतील.

दिव्यांग संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील करंजुले, सुनिता वाळेकर, राजेंद्र भुजबळ, गौतम आढाव, संगिता मापारी, ॲड. उज्वला घोडके यांच्यासह खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून प्रत्येक दिव्यांग हा स्वावलंबी झाला पाहिजे, त्याला समाजात मानाचे स्थान मिळाले पाहिजे यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने अहोरात्र काम सुरू आहे.

### खा. लंके यांचे नि:स्वार्थ काम

**दिव्यांगांच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी खा. डॉ. नीलेश लंके हे सदैव काम करत आहेत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन नीलेश लंके अपंग कल्याणकारी प्रतिष्ठानचे सर्व सभासद काम करत आहेत. येत्या पाच वर्षात जास्तीत जास्त दिव्यांग स्वतः च्या पायावर उभे राहिले पाहिजेत हे स्वप्न उराशी बाळगून खा. लंके यांचे निस्वार्थपणे काम सुरू आहे.**

सुनील करंजुले

# अभिजित आहेर गुप्तचर अधिकारी

## निघोजमध्ये हृदय सत्कार



निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील श्री.मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सहदेव आहेर व प्रा. डॉ. विद्या आहेर यांचे चिरंजिव अभिजित यांची भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या गुप्तचर खात्यात गुप्तचर अधिकारी म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल निघोज नगरीमध्ये त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला.**

निघोज ग्रामस्थ, ग्रामपंचायत, पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने निघोज ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच चित्राताई वराळ, उपसरपंच ज्ञानेवर वरखडे, अप्पासाहेब वराळ, अस्लमभाई इनामदार याच्या हस्ते अभिजित यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. सहदेव आहेर, प्रा. विजया आहेर, प्रा. रसाळ, बाबाजी वाघमारे, भास्कर कवाद, संदीप इधाटे, सचिन जाधव, दत्ता ढुबे आदी उपस्थित होते. पत्रकार भास्कर कवाद, बाबाजी वाघमारे यांची यावेळी भाषणे झाली.

### तालुक्याला भुषण

**देशाच्या गृहमंत्रालयात गुप्तचर अधिकारी म्हणून अभिजित यांना काम करण्याची संधी लाभली ही बाब तालुक्यासाठी भुषणावह आहे. पारनेर तालुक्याला वैभवशाली परंपरा आहे. या वैभवाला साजेशी कामगिरी अभिजित यांच्याकडून होईल. प्राचार्य आहेर व प्रा. ढवळे यांना अभिमानान वाटेल अशा पदावर अभिजित काम करणार आहेत.**

चित्रा सचिन वराळ, सरपंच निघोज


### जिद्द, चिकाटीच्या जोरावर यश

**गुणवंत विद्यार्थी म्हणून अभिजित यांचा संपूर्ण शिक्षणादरम्यान लौकीक होता. प्राध्यापक असलेल्या आई-वडीलांचे मार्गदर्शन आणि जिदद आणि चिकाटीच्या माध्यमातून त्यांनी या यशला गवसणी घातली आहे. तालुक्यासाठी, जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. अभिजित यांचे आजोळ निघोज येथील आहे. त्यामुळे त्यांची ही निवड निघोजकरांसाठी भुषणावह आहे.**

ज्ञानेश्वर वरखडे
उपसरपंच, निघोज

# अळकुटी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

## भारतीय ज्ञान व्यवस्था विषयावर एक दिवसीय परिषद । प्राचार्य डॉ. कुंदा कवडे यांची माहिती




अळकुटी : प्रतिनिधी

**अळकुटी महाविद्यालयात भारतीय ज्ञान व्यवस्था या विषयावर १ मार्च रोजी एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी दिली.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार भारतीय ज्ञान व्यवस्था या विषयास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. सर्वच विद्यापीठांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. प्रत्येक ज्ञान शाखा या विषयाशी जोडली गेलेली असल्याने यासंबंधी नव नवीन संशोधन व सद्यकालीन उपाययोजनांना विशेष संधी आहेत. म्हणून या परिषदेसाठी कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान,अभियांत्रिकी,औषधनिर्माशास्त्र, विधी व कायदा शाखा, वैद्यकीय शाखा, शिक्षणशास्त्र, क्रीडा शाखा, ग्रंथालयशास्त्र आदी सर्व ज्ञान शाखांचा यात समावेश आहे.

या परिषदेचे उद्घाटन जि. प.च्या मा. अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या हस्ते होणार आहे. डॉ. श्रध्दा कुंभोजकर या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागप्रमुख बीजभाषक म्हणून यावेळी उपस्थित राहणार आहेत. प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे, प्रा. डॉ. महेश खर्डे, डॉ. शांताराम चौधरी, डॉ. भाऊसाहेब रणपिसे, डॉ. आनंद कुलकर्णी, प्राचार्य डॉ. कुंदा कवडे हे यावेळी प्रमुख साधन व्यक्ती मार्गदर्शक तर समारोप सत्रासाठी मा. खा. डॉ. सुजय विखे, सिताराम खिलारी हे उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, डॉ. सुष्मिता विखे, डॉ. शिवानंद हिरेमठ, डॉ. राम पवार, दिनेश बाबर, भाऊसाहेब डेरे, राहुल शिंदे, सुनील थोरात यांचीही उपस्थिती लाभणार आहे.
परिषदेसाठी शोधनिबंध पाठविण्याची अंतिम तारीख १५ फेब्रुवारी ही आहे. या परिषदेसाठी जास्तीत जास्त संख्येने संशोधक अभ्यासकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे, उपप्रचार्य प्रा. अमोल नालकर, समन्वयक प्रा. संजय जाधव, परिषद समन्वयक अमोल रोकडे, सहसमन्वयक प्रा. संदीप गेटम, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. अर्जुन चाटे यांच्यासह सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भक्ती पंढरीतून ग्रामविचारांचे परिवर्तन घडेल

## पांडूरंग महाराज वावीकर यांचा विश्वास । बोधचिन्हाचे अनावरण




गोरेगाव : प्रतिनिधी

**मानवी अंतकरणात बदल घडविण्याचे सामर्थ्य संतांच्या विचारात असून भक्ती पंढरी महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामविचारांचे परिवर्तन घडेल अशी अपेक्षा पांडुरंग महाराज गिरी वावीकर यांनी व्यक्त केली.**

गोरेगाव येथे ३ एप्रिलपासून संपन्न होणाऱ्या सुवर्ण महोत्सवी भक्ती पंढरीच्या बोधचिन्हाचे अनावरण ह.भ.प. वावीकर महाराज यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते.जिल्हा परिषदेच्या कृषि व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती बाबासाहेब तांबे, माजी सरपंच राजाराम नरसाळे, उपसरपंच अण्णा पाटील नरसाळे,सेवा संस्थेचे अध्यक्ष संभाजीराजे नरसाळे यावेळी उपस्थित होते.

ह.भ.प. वावीकर महाराज म्हणाले की,गोरेगाव येथे संपन्न होणारा भक्ती पंढरी हा अभूतपूर्व सोहळा असून कीर्तन, भागवत कथेच्या माध्यमातून येथे संतांची मांदियाळी भरणार आहे या सोहळ्याच्यानिमित्ताने इतिहास घडणार असून भविष्यात याचा इतिहास सुवर्ण अक्षराने लिहिला जाईल असेही वावीकर म्हणाले.

यावेळी अभयसिंह नांगरे, अंबादास काकडे,बापूसाहेब नांगरे,दादाभाऊ नरसाळे, पी.के. नांगरे,बाबासाहेब नांगरे, मंजाबापू नरसाळे,विवेक पानमंद आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### राजकारणाचे जोडे बाहेर ठेवा !

**राजकारण हे राजकारणाच्या पद्धतीने होतच असते मात्र आध्यात्मिक कार्यक्रमात राजकारणाची जोडे वेशीबाहेर ठेवून सर्व ग्रामस्थांनी एक दिलाने हा सोहळा संपन्न करावा असे आवाहन वावीकर महाराज यांनी केले.**

# गुरूदेवची गुणवत्ता पाहून सहसंचालक आवाक !

## अचानक भेट देत तपासली गुणवत्ता

सुपा : प्रतिनिधी

**राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षण सहसंचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांनी सुप्यातील गुरूदेव शिक्षण संकुलास अचानक भेट देत विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली असता ते आवाक झाले.**

डॉ. पानझाडे यांनी गुरूदेव शिक्षण संस्थेच्या सेमी इंग्लिश स्कुल व गुरूदेव सीबीएसई स्कूल या दोन्ही शिक्षण संकुलांची पाहणी केली. वर्गांना भेटी देत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शाळेची गुणवत्ता पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. गुरूदेवमधील शिक्षण म्हणजे यशाची गुरूकिल्ली असे गौरवोद्गार त्यांनी काढले. माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर तसेच माध्यमिक विभागाचे विस्तार अधिकारी भिवसेन पवार हे त्यांच्यासमवेत होते.

डॉ. पानझाडे व दरेकर यांनी गुरूदेव शिक्षण संस्थेच्या सीबीएई स्कुलची पाहणी करत सीबीएसई या नव्या अभ्यासक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य तुषार कदम, पर्यवेक्षक मंगेश चितळकर आदी उपस्थित होते.



### उपसंचालकांनी दिली संदिग्ध प्रश्नांची उत्तरे !

**डॉ. श्रीराम पानझाडे यांनी पहिली व पाचवीच्या विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून गुणवत्तेची चाचणी घेतली. पाचवीच्या वर्गास भेट दिली असता वर्गातील ४० पैकी २९ विद्यार्थी रविवारी झालेल्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २२० गुणांच्या पुढे असल्याची माहीती देण्यात आल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. त्याबरोबरच परीक्षेतील संदिग्ध प्रश्नांची उत्तरेही विद्यार्थ्यांनी शिक्षण उपसंचालकांकडून जाणून घेतली.**

### काळाप्रमाणे शिक्षण

**आमची शिक्षण संस्था काळाप्रमाणे शिक्षण देत आहे. शिक्षण देण्याची पध्दत बदलली तरच आपले विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर टिकतील म्हणून सीबीएसई अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यातून नवचैतन्य, नवसंस्कृती, नवसमाज निर्माण करण्याचे काम आमची संस्था करत आहे.**

संतोष मगर
अध्यक्ष, गुरूदेव शिक्षण संस्था

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com